# घटक १) कादंबरी : स्वरूप आणि घटक

**कादंबरीचे स्वरूप :**

कादंबरी हा सुपरिचित व लोकप्रिय असा कथनात्मक गद्य वाङ्मयप्रकार आहे. साहित्याच्या कथा, कविता, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारांप्रमाणेच कादंबरी हा वाङ्मयप्रकार आहे. घटना, कथानक, पात्रे, निवेदक, निवेदनशैली, भाषा इत्यादी घटकांनी कादंबरीची संरचना उभी राहते. प्रदीर्घ कहाण्या, पुराणकथा, नीतिकथा, विज्ञानकथा, साहसकथा, रहस्यकथा या गद्य कथनात्मक साहित्याशी कादंबरीचे जवळचे नाते असले तरी ती यापेक्षा वेगळी आहे. 'कादंबरी' ही संज्ञा ज्या साहित्यप्रकाराला लावली जाते; तो मात्र पाश्चात्य वाङ्मयाच्या इतिहासात अठराव्या शतकात व मराठीत एकोणिसाव्या शतकात निर्माण झाला असे मानले जाते. पाश्चात्य कादंबरी जन्माला आल्यानंतर तिला 'नॉव्हेल' संबोधले जावू लागले; कारण ती पूर्वीच्या सर्व वाङ्मयीन परंपरा व कल्पना यांच्यापेक्षा महाकाव्य, नाटक, आख्याने इत्यादी प्रकारांहून नवे – वेगळे रूप धारण करून आली.

मराठी साहित्यात विशिष्ट स्वरूपाच्या वाङ्मयप्रकाराचा निर्देश करणारी 'कादंबरी' ही संज्ञा रूढ आहे. कादंबरी हे कथनात्मक गद्य लिखित स्वरूपात असते. लिखित स्वरूपामुळे या कथनाला एक निश्चित असा आरंभ व अखेर असते. कादंबरी हे कथात्म गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप आहे. यात कथनाला किंवा निवेदनाला महत्त्व असते. कादंबरीत अनेक विषय येत असल्याने तिने व्यापलेल्या विषयांची वर्गवारी करता येत नाही. लघुकथा आणि लघुकादंबरी ह्यांच्यापेक्षा तिला मानवी जीवन व्यवहारांचे दर्शन अधिक व्यापक स्वरूपात घडविता येते. घटना, व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या साह्याने मानवी जीवनाशी निगडीत असणाऱ्या वास्तवाच्या विविध स्तरीय रूपांचे दर्शन तिला घडविता येते. कादंबरीत स्थलकालाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो. कादंबरीचे हे सर्व गुणधर्म म्हणजे तिची वैशिष्टे आहेत. कादंबरी हा लवचिक व समावेशक साहित्यप्रकार असल्याने तिची सर्वसमावेशक व्याख्या करणे कठीण आहे. त्यामध्ये **कॅथरीन लीव्हर** यांनी केलेली कादंबरीची व्याख्या जास्तीतजास्त समावेशक आहे. ती अशी : **'कादंबरी म्हणजे कथनात्मक लिखित गद्याचा, बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा, लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंतवून टाकणारा रचनाबंध होय.'**

**प्रा.मा.का.देशपांडे : 'कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलासक्त गद्यचित्र होय.**

कादंबरीतील कल्पित वास्तवच असते. हे कल्पित जग प्रत्यक्षागत वाटण्यासाठी कादंबरीकार स्थलकाल, पात्रांची नावे, पोषाख, त्यांच्या भावभावना, पात्रांमधील संबंध, निसर्ग इत्यादी प्रत्यक्षातले जग आधाराला घेऊन, प्रत्यक्षागत

बीजातून कादंबरीकार कल्पित वास्तवाचा पसारा उभा करीत असतो. कादंबरीतील 'वास्तवा'मुळे कादंबरी इतर सर्वच वाङ्मयप्रकाराहून वेगळी ठरते.

**कादंबरीचे घटक :**

कादंबरीच्या संरचनेत विविध घटक असतात. त्यामध्ये कथानक, पात्रे, स्थलकाळाने तयार होणारे वातावरण, निवेदनपद्धती, भाषा इत्यादी घटकांचा समावेश होतो.

**१) कादंबरीचे कथानक :**

कथानक हा कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. कादंबरीतील कृती कोणत्या स्थलकालात घडत आहेत, कादंबरीतील पात्रे काय करीत आहेत, त्यांचे विचार काय आहेत हे कादंबरीकार सांगत असतो. या साऱ्यांची जुळणी करणाऱ्या एकात्म, घट्ट विणीलाच 'कथानक' असे म्हणतात. कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार असल्यामुळे त्यात सांगण्याजोगा मजकूर भरपूर असतो. या मजकूराला आपण कथानक असे म्हणतो. कथानकात घटना, प्रसंग, पात्रे, निवेदनपद्धती या सर्वांचा समावेश असतो. कथानकात हे सारे घटक एकजिनसीपणाने येत असल्यामुळे कथानक एकात्म होते. कथानकात घटना, पात्रे यांचा समावेश असतो. घटना व पात्रे यांच्या परस्परसंबंधातून क्रिया घडतात. त्यामुळे कथानक साकार होऊ लागते. घटना हा कादंबरीतला लहानातला लहान घटक असतो. घटनेला हेतू, जीवनदृष्टी, मूल्यभाव यांची आवरणे असतात. त्यामुळे घटनेचे मूळ स्वरूप लुप्त होऊन, ती नवे रूप धारण करते. कादंबरीतील घटनांची कार्यकारणभावानुसार मांडणी झाली की कथानक तयार होते. कथानक हे घटनांच्या आधारे पुढे जात असते व या घटना पात्रांकडून होत असतात. पात्रांकडून घडणाऱ्या या घटनांमागे हेतू असतो. म्हणून कादंबरीत कथानकाबरोबर पात्रेही महत्त्वाची असतात. कथानकात उपकथानके मूळ कथानकाला प्रभावशाली करण्यासाठी येत असतात.

कथानकात उत्कंठा, हुरहूर, विस्मय, कलाटणी वगैरे तंत्रांचा अवलंब केलेला असतो. कथानकात उपकथानके मूळ कथानकाला प्रभावशाली करण्यासाठी येत असतात. वास्तववादी, अस्तित्वलक्ष्यी कथानकाचे निराळेपण सहजपणे जाणवते. थोडक्यात, कथानक ही व्यापक गोष्ट आहे म्हणून कथानकात कादंबरीतील पात्रे, प्रस्तुतीकरणपद्धती, वातावरण, दृष्टिकोन, भाषा या सर्वच घटकांचा समावेश होतो. विविध प्रकारचे विषय घेऊन जीवनाशी संबंधित अशी आशयसूत्रे पकडून कादंबरीने सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, काव्यात्म, आत्मचरित्रात्मक, संज्ञाप्रवाहात्मक, विज्ञानविषयक असे अवतार धारण केलेले दिसतात. हे सर्व प्रकार कथानकातून निष्पन्न होतात.

HRM MARATHI SDS

### २) कादंबरीतील पात्रे :

कादंबरी हा जीवनव्यवहाराबरोबर प्रवास करणारा प्रवाही असा साहित्यप्रकार आहे. जीवनव्यवहाराच्या केंद्रस्थानी मनुष्य असतो. त्याच्या सादप्रतिसादांनीच जीवनाला रंगढंग प्राप्त होतात. जीवनव्यवहाराच्या रंगढंगाप्रमाणेच 'त्या' मनुष्यालाही रंगढंग प्राप्त होऊन व्यक्तिमत्त्व लाभते. कादंबरीत अशी व्यक्तिमत्त्वे पात्ररूपाने वावरत असतात. कथानकाला गतिमान करण्याचे काम ही पात्रेच करीत असल्याने 'पात्रे' हा कादंबरीचा मूलभूत घटक आहे. कादंबरीकार या पात्रांच्या इच्छा, आकांक्षा, क्रिया–प्रतिक्रिया यांचे दर्शन घडवून ते खरेखुरे वाटावेत असा प्रयत्न करीत असतो. पण कादंबरीतील पात्रे या काही खरोखरीच्या व्यक्ती नसतात. त्या खऱ्या असल्याचा अभास निर्माण केलेला असतो. कादंबरीचा विशिष्ट दृष्टिकोन या पात्रांद्वारा राबविला जात असतो. व्यक्ति – समाज यांच्याशी कादंबरी हा साहित्यप्रकार निगडित असल्यामुळे व समाजात नाना प्रकारच्या व्यक्ती आढळतात; त्यामुळे 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने 'व्यक्ती तितकी पात्रे' असे म्हणावयास हवे.

कादंबरीतील पात्रे ही कादंबरीकाराची 'निर्मिती' असते. या निर्मितीमागे कादंबरीकाराचा विशिष्ट हेतू असतो. त्यामुळे कादंबरीत विविध पात्रे असली तरी त्या हेतूनुसार त्यांना वेगवेगळे महत्त्व दिलेले असते. कादंबरीत येणाऱ्या पात्रांचे ढोबळपणे मुख्य पात्रे व गौण पात्रे असे वर्गीकरण केले जाते. मुख्य पात्रांत नायक, नायिका, खलनायक, प्रतिनायक यांचा समावेश होतो, तर गौण पात्रांत इतर सर्वसाधारण पात्रांचा समावेश होतो. खरे तर ज्याच्यामुळे जी कृती घडते, त्या कृतीचे ते पात्र नायकच असते. म्हणजे प्रत्येक पात्र महत्त्वाचे असते. कादंबरीतील पात्रे जशी मानवी असतात, तशी अमानवीदेखील असतात. एखाद्या वैज्ञानिक कादंबरीत एखादे 'यंत्र' पात्र असते. निसर्गदेखील पात्ररूप होऊन अवतरतो. विशिष्ट व्यक्तीशी निगडीत असलेला एखादा संदर्भदेखील पात्ररूप होतो.

एकच कादंबरीकार एकाच कादंबरीत पात्रचित्रणाचे वेगवेगळे प्रकार वापरू शकतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष चित्रणही तो करीत असतो. या चित्रणाद्वारे तो त्या विशिष्ट पात्राचे सर्वांगीण, विविध दृष्टिकोणातून दर्शन वाचकांना घडवीत असतो. थोडक्यात कादंबरीकार कथावस्तूच्या व आशयाच्या मागणीप्रमाणे पात्रचित्रण करीत असतो. पात्रांचे स्वभावचित्रण करण्याचे कौशल्य कादंबरीकार परंपरेकडून, मिळालेल्या ज्ञानातून, सामाजिक व्यवहारातून आणि मानसशास्त्राच्या अभ्यासातून किंवा प्रतिभेच्या अंगभूत सामर्थ्याने मिळवीत असतो.

### ३) कादंबरीतील वातावरण :

कादंबरीतील कथानक हे ज्या कुठल्या वातावरणात घडते; ते वातावरण आभासात्मक असते. म्हणजे खरे असल्याचा भास निर्माण केलेला असतो. कादंबरीतील ही पात्रे या अभासी जगात वावरत असतात. त्यांच्याभोवती एक विविध वस्तूंनी भरलेले जग असते. त्यालाच आपण 'वातावरण' (ॲटमॉसफिअर) म्हणतो.

कादंबरीत असणारी स्थलकालाची चौकट, भौगोलिक, सांस्कृतिक परिसरात ही पात्रे वावरतात. ती घरे – रस्ते हा सारा 'वातावरणाच' भाग समजला जातो. कादंबरी हा जीवनप्रवाहाशी समांतरपणे चालणारा वाङ्मयप्रकार असल्यामुळे स्वाभाविकपणे त्याचा आवाका मोठा आहे. परिणामत: समाज, त्यातील व्यक्ती, त्यांचे जीवन या साऱ्यांचे संबंधासह जगणे कादंबरीत येते. कादंबरीकार हा सर्व आवाका लक्षात घेऊन त्याच्या परीने जीवनदर्शन घडवण्याचा प्रयत्न करीत असतो. जीवनाला बाह्य व आंतरिक असे दोन्ही संदर्भ असतात. बाह्य संदर्भात, मानवी संबंध विविध स्थळे व काळ यांच्याशी निगडीत असतात. आंतरिक संबंधात व्यक्ती, तिचे समग्र परंपरेतले, समाज व्यवस्थेतले स्थान यांचा तीव्रपणे विचार करते. थोडक्यात कादंबरीला वास्तवता प्राप्त होण्यासाठी, पात्रांना जिवंतपणा प्राप्त करून देण्यासाठी विशिष्ट स्थलकाल उभारावे लागते; यालाच आपण वातावरण असे म्हणतो. उदा. 'बनगरवाडी' कादंबरीतील माणसे जितकी महत्त्वाची आहेत; त्याहून तिथले 'वातावरण' महत्त्वाचे आहे. त्या वातावरणानेच ती माणसे तशी घडली आहेत. वातावरण या घटकामुळे कादंबरीला संदर्भ प्राप्त होऊन एक व्यापक परिप्रेक्ष्य प्राप्त होतो व त्या व्यापक परिप्रेक्ष्यावर जीवनविषयक कित्येक गूढे उकलण्यास कादंबरीकाराला शक्य होते.

स्थलकालपरिस्थितीशी संबंधित वातावरणाचे वर्गीकरणही करता येते. भौगोलिक, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मानसिक, इत्यादी. लेखकांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे तात्त्विक चिंतन हाही वातावरणाचा भाग म्हणून येत असतो.

### ४. कादंबरीचे निवेदन :

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार आहे. कथानक, पात्रचित्रण, वातावरणनिर्मिती, भाषा या घटकांचा 'तंत्रा'त समावेश होतो. पण या सर्वांपेक्षाही कादंबरीचा महत्त्वाचा व आधारभूत घटक आहे, तो म्हणजे निवेदन; म्हणजेच कथन. कादंबरीत हे निवेदन कोणीतरी करीत असतो. कोणाच्या तरी दृष्टीतून, घटलेल्या घटनांचे, पात्रांचे, त्यांच्या कृतींचे, पात्रांच्या स्वभावाचे चित्रण केले जात असते; त्यांच्याविषयी 'कथन' केले जाते. निवेदन म्हणजे घटनांची मालिका. निवेदनात सातत्य व सूत्र असावे लागते. निवेदनात कार्यकारणभावाने गुंफलेल्या घटनांची साखळी मांडावी लागते.

HRM MARATHI SDS

कादंबरीचा निवेदक नेहमी कादंबरीकार असतो असे नाही. म्हणजे कादंबरीचे निवेदन कधीकधी पात्रांच्या तोंडून केले जाते. उदा. 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीतील मुख्य पात्र 'यमुना' आपली कहाणी मांडते. वा. म. जोशी यांच्या 'इंदू काळे सरला भोळे' या कादंबरीतील पात्रे एकमेकांना पाठवलेल्या पत्रांतून घटनांचे वा कृतींचे निवेदन करतात.

निवेदनाच्या दोन पद्धती आहेत. **१. प्रथमपुरूषी निवेदन** ( म्हणजे मी, आम्ही) उदा. 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीत 'यमुना' या स्त्रीपात्राद्वारे केलेले निवेदन किंवा 'कोसला' या कादंबरीत 'पांडुरंग सांगवीकर' या पुरूष पात्राने केलेले निवेदन. प्रथमपुरूषी निवेदन एका पात्राने केलेले असल्याने कादंबरीतील इतर पात्रांच्या चित्रणात एक प्रकारची तटस्थता निर्माण होते. तर वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती' कादंबरीत वेगवेगळया पात्रांनी केलेली आत्मनिवेदने आहेत. त्यामुळे एकाच प्रसंगासंबंधीच्या जाणिवेत, समजुतीत आसणारा फरक स्पष्ट होतो. **२.तृतीय पुरूषी निवेदन** : (म्हणजे तो, ती, ते / ते, त्या, ती) या प्रकारच्या निवेदनातला निवेदक हा सर्वसाक्षी असतो. तो सर्वत्र संचार करीत असतो. सर्व पात्रांच्या स्वभावाचे, त्यांच्यात घडणाऱ्या संभाषणांचे, घटनांचे, त्याला ज्ञान असते. पात्रांच्या मनात प्रवेश करून त्यांचे विचार तो मांडू शकतो.

निवेदनाप्रमाणेच निवेदनाचा स्वर (टोन) हाही महत्त्वाचा असतो. कधी लेखक तटस्थ असतो, तर कधी लेखक आपल्या पात्राविषयी सहानुभूती प्रकट करीत असतो; तर कधी त्याचा स्वर उपहासाचाही असू शकतो. कादंबरीच्या निवेदनाला एक गती व लय असते; ती सांभाळण्यावर कादंबरीच्या निवेदनाचे प्रवाहीपण अवलंबून असते.

### ५. कादंबरीची भाषा आणि शैली :

कथानक, पात्रचित्रण व वातावरणनिर्मिती यांच्याप्रमाणेच 'भाषा' हाही कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. भाषा आणि कादंबरीची शैली यांवर कादंबरीची परिणामकारकता अवलंबून असते. कादंबरीत निवेदनाची भाषा वेगळी आणि संवादाची भाषा वेगळी असते. कादंबरी वास्तवाधारित साहित्यप्रकार असल्याने पात्रांच्या तोंडची भाषा जास्तीतजास्त वास्तवदर्शी, व्यवहाराच्या जवळची असावी असे मानले जाते. कादंबरीच्या वेगळया प्रकारांमधल्या भाषेत भिन्नत्व असू शकते. उदा. ऐतिहासिक कादंबरीचे निवेदन आजच्या भाषेत पण पात्रांच्या तोंडी वा विशेष ऐतिहासिक तपशील वर्णन करताना इतिहासकालीन शब्द वापरले जातात.

कादंबरी वा कोणतीही साहित्यकृती व्यवहारी भाषेचा जसाचा तसा वापर करीत नाही. कादंबरीकार वास्तवाच्या आधारे कल्पित विश्वाची निर्मिती करीत असल्याने तिला अनुसरणारी भाषा वापरावी अशी अपेक्षा असते. म्हणूनच जयवंत दळवी यांच्या 'चक्र' कादंबरीची भाषा वेगळी प्रभावी ठरते. केवळ कल्पित प्रदेशाचीच नव्हे तर कादंबरीतील

आशयद्रव्याशी, अनुभूतीशी आणि ज्या सांस्कृतिक गटाचे व काळाचे वर्णन कादंबरीत केलेले असते, त्याच्याशी सुसंगत अशी भाषा कादंबरीकाराने वापरली पाहिजे.

कादंबरीतल्या 'वास्तवा'विषयी कल्पना जसजशी बदलत गेली तसतसे कादंबरीच्या 'भाषेचे' स्वरूपही बदलत गेले. कादंबरी म्हणजे हुबेहुब भोवतालच्या जगातील व्यक्तींचे व घटनांचे चित्र नसते तर ते एक घडलेले कल्पित विश्व असते व त्यातल्या प्रत्येक तपशिलाला कादंबरीकार एक वेगळा 'अर्थ' देत असतो. ह्या नव्या जाणिवेमुळे कादंबरीतील भाषा अधिकाधिक अर्थघन करण्याकडे कादंबरीकाराचे लक्ष पुरवले जाऊ लागले. पात्रांच्या पोशाखांचे, लकबींचे व हावभावाचे वर्णन करणाऱ्या ओघवत्या, चित्रदर्शी भाषेपेक्षा खंडित, तुटक वाटणारी पण प्रतिभासंपन्न, अर्थवाही भाषा घडवली जाऊ लागली.

कादंबरीची भाषा आशयानुसार बदलत असते. पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांनुसार शैली बदलतानाही दिसते. परंतु लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्याच्या जीवनविषयक भूमिकेचा, वाङ्मयविषयक भूमिकेचाही शैलीवर परिणाम होत असतो. त्यामुळे एक लेखकाच्या विविध कृतींतून त्याची विशिष्ट शैली आपल्या ध्यानात येते. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, पु. भा. भावे, कमल देसाई, भालचंद्र नेमाडे इत्यादी लेखकांची विशिष्ट शैली त्यांच्या कादंबऱ्यातून दिसते.

थोडक्यात कादंबरी हा लोकप्रिय साहित्यप्रकार आहे. लेखक आपल्या मनातील आशय 'प्रतिभा' शक्तीच्या साहाय्याने विस्तृत स्वरूपात कादंबरीत कथन करीत असतो. कादंबरीचा आकृतीबंध सर्व काही सामावेल असा आहे. विशाल कथानक, उपकथानके, असंख्य व्यक्तिरेखा, मनोवेधक शैली, कलात्मकतेने रेखाटलेले घटना – प्रसंग यामुळे कादंबरी आकाराला येते.

HRM MARATHI SDS